दिनांक १७/०३/२०२१

## प्रसिध्दी पत्रक

**आलोसे १)शेख अफसर शेख इलोमोद्दीन, पद- पोलीस हवालदार, २) रत्नाकर पुडंलिक बोर्डे , पद- पोलीस हवालदार, दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.सिडको औरंगाबाद शहर यांनी ५,०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद च्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकांचे नावे, हुद्दा | :- | १) शेख अफसर शेख इलोमोद्दीन, वय ५२ वर्ष, पद- पोलीस हवालदार, रा. हुसेन कॉलनी, गल्ली नंबर ०६, पुडलिंक नगर रोड औरंगाबाद<br>२) रत्नाकर पुडंलिक बोर्डे, वय ५० वर्ष, पद- पोलीस हवालदार, रा. म्हाडा कॉलनी, मुर्तीजापुर, औरंगाबाद<br>दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.सिडको औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.सिडको, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री विकास घनवट , पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ५,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्याविरुध्द एमआयडीसी सिडको पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तक्रारदार यांना मा. न्यायालयाने लावलेली हजेरी बंद करुन , गुन्हयाचे तपासकामी मदत करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | नारेगाव पोलीस चौकी, नारेगांव ता. जि. औरंगाबाद. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्याविरुध्द एमआयडीसी सिडको पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तक्रारदार यांना मा. न्यायालयाने लावलेली हजेरी बंद करुन, गुन्हयाचे तपासकामी मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे शेख अफसर शेख इलोमोद्दीन, पोलीस हवालदार, ने. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.सिडको औरंगाबाद शहर हे ५,०००/- रु लाचेची मागणी करित असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, १) शेख अफसर शेख इलोमोद्दीन, पद- पोलीस हवालदार, २) रत्नाकर पुडंलिक बोर्डे, पद-पोलीस हवालदार,दोन्ही नेमणुक पोलीस स्टेशन एम.आय. डी.सी.सिडको औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे ५,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, १) शेख अफसर शेख इलोमोद्दीन, पद- पोलीस हवालदार, नेमणुक - पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.सिडको औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन ५,०००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.सिडको औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. विकास घनवट यांनी केली आहे. त्यांना पोलीस अंमलदार मिलींद इप्पर, संतोष जोशी, राजेंद्र जोशी, चालक अंमलदार देवसिंग ठाकुर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

17/03/2021

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**